RNI No. MAHBIL /2009/31745
Reg. No. MCS/175/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ३, अंक १५(२)] बुधवार, मार्च ८, २०१७/फाल्गुन १७, शके १९३८ [पृष्ठ २, किंमत : रुपये ८.००

असाधारण क्रमांक २४

प्राधिकृत प्रकाशन

### नगरविकास विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ मार्च २०१७

### अधिसूचना

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.**

क्रमांक स्थासक. २०१६/प्र. क्र. १४/२०१६/नवि-३२ —**ज्याअर्थी**, महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० याच्या नियम ४८ च्या उप-नियम (१) च्या खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण, भाग एक-अ मध्य उप-विभाग, दिनांक २९ मार्च २०१६ या मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली शासकीय अधिसूचना, नगरविकास विभाग क्रमांक. स्थासक. २०१६/प्र. क्र. १४/२०१६/नवि-३२ दिनांक २९ मार्च २०१६ द्वारे, महाराष्ट्र महानगरपालिका स्थानिक संस्था कर अभय योजना, २०१५ (यात यानंतर जिचा निर्देश " अभय योजना " असा करण्यात आला आहे.) या अंतर्गत दाखल करावयाच्या विवरणाचे निर्धारण पूर्ण करण्यासाठीचा दिनांक ३१ मार्च २०१६ वरून ३१ मार्च २०१७ पर्यंत वाढविला होता ;

**आणि ज्याअर्थी**, प्रलंबित अशा स्थानिक संस्था कराची अधिक चांगली वसुली करता यावी म्हणून, उक्त अभय योजनेअन्वये दाखल करावयाच्या विवरणांचे निर्धारण पूर्ण करण्यासाठीचा दिनांक ३१ मार्च २०१८ पर्यंत वाढविण्याकरिता, उक्त योजनेमध्ये सुधारणा करणे इष्ट असल्याचे शासनाचे मत आहे ;

**त्याअर्थी**, आता, महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० च्या कलम ४८ मधील उप-नियम (१) च्या खंड (क) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अभय योजनेमध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अभय योजनेमधील खंड (३) मध्ये, उप-खंड (नऊ) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (नऊ) अभय योजना, २०१५ अन्वये दाखल करावयाच्या विवरणांचे निर्धारण दिनांक ३१ मार्च २०१८ पूर्वी करण्यात येईल ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पा. जा. जाधव,
शासनाचे सहसचिव.



Scanned by CamScanner

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 8th March 2017

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

No. LBT. 2016/CR-14/2016/UD-32.—Whereas, in exercise of the powers conferred under clause (*a*) of sub-rule (*9*) of rule 48 of the Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) Rules, 2010, the Government of Maharashtra has, *vide* the Government Notification, Urban Development Department, No. LBT. 2016/C.R. 14/2016/UD-32, dated the 29th March 2016, published in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary, Part-I-A, Central Sub-section, dated the 29th March 2016, extended the date for completing the assessment of returns filed under the Maharashtra Municipal Corporation Local Body Tax Amnesty Scheme, 2015 (hereinafter referred to as the "Amnesty scheme"), from 31st March 2016 to the 31st March 2017 ;

And whereas, the Government is of the opinion that for the better recovery of pending Local Body Tax, it is expedient to amend the said Amnesty Scheme to extend the date for completing the assessment of returns filed under the said Amnesty Scheme upto 31st March 2018 ;

Now, therefore, in exercise of the powers conferred under clause (*a*) of sub-rule (*9*) of rule 48 of Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) Rules, 2010, and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following amendments to the said Amnesty Scheme, namely :—

In the said Amnesty Scheme, in clause 3, for sub-clause (*ix*), the following sub-clause shall be substituted, namely :—

"(*ix*) The assessment of returns filed under the Amnesty Scheme 2015 shall be completed before 31st March 2018."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. J. JADHAV,
Joint Secretary to the Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

Scanned by CamScanner